ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १८ | पुणें, बुधवार तारीख २७ ऑगस्ट, १९५२ | अंक १५

## विविध माहिती

**भारतामधील तंबाखूचा खप**—हिंदुस्थानची फाळणी झाल्यानंतर भारतामधील तंबाखूचा खप वाढत चालला असल्याचें आढळून आलें आहे. हिंदनें १९५० सालीं निरनिराळ्या प्रकारची जितकी तंबाखू वापरली त्यापेक्षां १९५१ सालीं ११,००० टन अधिक वापरली. भारतांत सिगरेट्स तयार करणारे २० कारखाने असून त्यांना दरवर्षी सुमारें ४,५०,००,००० पौंड तंबाखू लागते.

**अणुशक्तीसाठी 'सायक्लोट्रान'**—प. युरोपांतील शास्त्रज्ञांच्या उपयोगासाठी अणुशक्तीचें उत्पादन करणारा 'सायक्लोट्रान' उभारण्यांत यावा अशी विनंति ब्रिटनमधील शास्त्रज्ञ ब्रिटिश सरकारला करीत आहेत. ह्या यंत्रासाठी सुमारें ९०,००,००० पौंड खर्च येणार असून तें प. युरोपमधील सर्वांत मोठें अणुशक्ती-उत्पादक यंत्र असेल.

**ब्रिटनमधील खुनींची गैरसोय**—'अर्सेनिक' चा उपयोग करून कोणाचाही घात करणें ब्रिटनमधील गुन्हेगारांना आतां अवघड जाणार आहे. कारण 'अर्सेनिक' असलेल्या सर्व औषधांना ह्यापुढें एक प्रकारची पिवळ्या रंगाची छटा देण्यांत येणार आहे. त्यामुळें ज्यांना रंग दिसत नाहींत अशाच लोकांना त्यापासून धोका राहील.

**नट खरोखरीच भांडूं लागले**—अमेरिकेंत नटांचें युनियन असून त्याला 'अमेरिकन इक्विटी' असें नांव आहे. ह्या संस्थेनें आतां असे नियम केले आहेत कीं अमेरिकेंत नाटकांत काम करणाऱ्या ब्रिटिश नटानें संस्थेला निदान५०० डॉलर्स तरी दिले पाहिजेत. परकीय नाटक-कंपन्यांना अमेरिकन नाटकें करावयाचीं झाल्यास त्यांच्या नटवर्गांत निदान ६० टक्के नट अमेरिकन असले पाहिजेत. हे नियम रद्द करण्यांत न आल्यास ब्रिटिश नट ब्रिटनमध्यें असेच नियम करतील असा इषारा देण्यांत आला आहे.

**रेल्वे एंजिनांचें उत्पादन**—टाटा लोकोमोटिव्ह अँड एंजिनिअरिंग कंपनीनें गेल्या जानेवारींत अरुंद रुळावर चालणारें पहिलें रेल्वे एंजिन तयार केलें. त्यानंतर परदेशांतून आणलेल्या सुट्या भागांचा उपयोग करून आणखी दहा एंजिनें तयार करण्यांत आलीं. रेल्वेबोर्डानें कंपनीकडे ५० एंजिनांची मागणी नोंदली होती.

**हिऱ्यांचा लिलांव**—रेवा येथील सरकारी मालकीच्या हिऱ्यांच्या खाणींत सांपडलेल्या हिऱ्यांचा लिलांव करण्यांत येत आहे. ह्या लिलावांत १ आण्यापासून २८॥ रतीपर्यंत वजनाचे हिरे आहेत.

**कुटुंबनियोजन केंद्रें**—मद्रास कॉर्पोरेशननें चालविलेल्या तीन सूतिकागृहांना आणि शिशु-आरोग्य विभागांना आतां कुटुंबनियोजन केंद्रांची जोड देण्यांत आली आहे. ह्या केंद्रांचा जनतेनें नीट उपयोग करून घेतला तर आणखी २९ कुटुंबनियोजन केंद्रें कॉर्पोरेशन उघडणार आहे.

**मंगलोर येथील विमानतळ**— मंगलोरपासून १४ मैलांवर सध्या एक विमानतळ बांधण्याचें काम चालू आहे. तें काम चालू वर्षाअखेर पुरें होईल आणि तळाचा उपयोग करण्यास सुरवात होईल असें समजतें.

**रशिआच्या गटांतील राष्ट्रांचें औद्योगिक उत्पादन**— प. युरोपांतील राष्ट्रांना अमेरिकेकडून मदत मिळत असतांना सुद्धां पूर्व-युरोपमधील राष्ट्रांतील औद्योगिक उत्पादन त्यांच्यापेक्षां अधिक प्रमाणांत वाढलें आहे अशी माहिती अमेरिकन निरीक्षकांनीं प्रसिद्ध केली आहे. नियंत्रणें आणि वेठ-मजुरी ह्यांच्या योगानें ही वाढ झाली आहे असें त्यांचें मत आहे.

**भारतीय देवदारच चांगलें**—पेन्सिलींसाठी वापरण्यांत येणाऱ्या लाकडांत भारतामधील देवदारच अधिक चांगलें आहे असा निर्वाळा डेहराडून येथील जंगल संशोधन खात्यानें दिला आहे. सध्या पेन्सिली करण्यासाठी भारताला पूर्व-आफ्रिकेंतून सेडर लाकडाची आयात बऱ्याच प्रमाणांत करावी लागते.

**जगांतील सर्वांत मोठी यारी**—रशिआंत कुराबिशेन्ह येथें बांधण्यांत येत असलेला हैड्रो इलेक्ट्रिक वीज कारखाना जगांत सगळ्यांत मोठा आहे असें म्हणतात. ह्या धरणाच्या कामांत वापरण्यासाठी म्हणून रशिअन एंजिनिअर्सनीं एक प्रचंड यारी तयार केली आहे. ती ५०० टन वजन उचलूं शकते.

**परदेशी पुस्तकांची आयात**—भारत दरवर्षी सुमारें १ कोटी रुपये किंमतीचीं परदेशीय पुस्तकें आणि नियत-कालिकें आयात करतो. १९५१-५२ सालीं एकूण ९३,४९,९९८ रुपये किंमतीचीं पुस्तकें आयात करण्यांत आलीं. त्यांपैकीं ४२,००,००० रुपये किंमतीचीं इंग्लंडकडून आणि २८,००,००० रुपये किंमतीचीं अमेरिकेकडून आणण्यांत आलीं.

**किती ह्या सायकली !**—प. जर्मनींतील बॅकोल्ट नांवाच्या गांवीं २८,००० रहिवासी असून सायकलींची संख्या ३६,००० आहे. म्हणजे प्रत्येक घरांत दोनपेक्षां अधिक सायकली आहेत. सार्वजनिक इमारतींतून आणि नवीन घरांतून आतां सायकलींसाठी स्वतंत्र तबेलेच बांधण्यांत येत आहेत.

### कोलंबो योजना व तांत्रिक शिक्षण

कोलंबो योजनेप्रमाणें भारताला तांत्रिक सल्ला व शिक्षण ह्याबाबतींत मदत घ्यावी लागत आहे. परंतु मदत घेणाऱ्या आशिआंतर्गत देशांत भारत हा एकच देश असा आहे कीं तो दुसऱ्या देशांना, तशा प्रकारची मदतहि करीत आहे. भारतानें सीलोनला तीन तज्ज्ञ पुरविले आहेत आणि ५४८ शिक्षण घेणाऱ्यांपैकीं ३६ जणांची सोय केली आहे. पाकिस्ताननें फक्त एका उमेद्वाराच्या शिक्षणाची व्यवस्था केली आहे. कोलंबो योजनेंत ६५ तज्ज्ञ पुरविण्याची व्यवस्था आहे. पण भारताच्या वांटणीला फक्त दहाच आले आहेत. पाकिस्तानला मात्र ३१ आणि सीलोनला २४ तंत्रज्ञ पुरविण्यांत आले आहेत. भारताला ५७ तज्ज्ञ पाठविण्यासाठी आणि २१६ भारतीयांना शिक्षण देण्यासाठी अद्याप वाटाघाटी चालू आहेत असें समजतें. कोलंबो योजनेप्रमाणें १९८ भारतीयांना शिक्षण देण्यांत यावयाचें आहे. पाकिस्तान आणि सीलोन ह्यामधील अनुक्रमें १६३ आणि १२१ नागरिकांना शिक्षण देण्यांत यावयाचें आहे. कोलंबो प्लॅन ब्यूरोचे डायरेक्टर मि. ज्यॉर्फ विल्सन ह्यांनीं अशी इच्छा प्रदर्शित केली आहे कीं, ज्या देशांना मदत मिळावयाची आहे त्यांनीं ती कशा प्रकारें मिळावी ह्यासंबंधीं दिग्दर्शन केल्यास बरें होईल. मि. विल्सन हे नुकतेच ऑस्ट्रेलिआ व न्यूझीलंड ह्या देशांत दौरा काढून कोलंबोला गेले होते. ऑस्ट्रेलिआंतील तांत्रिक शिक्षणाच्या सोईविषयीं त्यांचा चांगला ग्रह झालेला आहे. ह्याविषयासंबंधीं बोलतांना त्यांनीं सिडने येथील तांत्रिक शिक्षण देणाऱ्या संस्थेचा मुद्दाम उल्लेख केला. ह्या संस्थेंत २५,००० विद्यार्थी शिकत असून तिचें आवार कित्येक एकरांवर पसरलेलें आहे.

---

### अमेरिकन नागरिकांचा खर्चिक षोक

अमेरिकन नागरिकांना शिकारीचा फार षोक आहे. जंगलांत जाऊन श्वापदांची शिकार करण्यासाठी गेल्या वर्षी अमेरिकन नागरिकांनीं ३३० कोटी पौंड खर्च केले. आठवड्याच्या अखेरीस सुटीचा उपयोग करून शिकार करण्याचा छंद बराच पसरलेला आहे. ह्या छंदापायीं अमेरिकन लोक दररोज १ कोटी पौंड खर्च करतात असा हिशोब करण्यांत आला आहे. मोठमोठ्या कंपन्यामधील अधिकारी आपल्या वार्षिक उत्पन्नाचा सुमारें २० टक्के भाग शिकारीसाठीं खर्च करतात. त्यांच्या खालोखाल कुशल कामगार, कारकून, शेतकरी व विद्यार्थी ह्या पेशांतील लोक दिसून येतात. खुद्द अमेरिकन जनतेला मात्र शिकारीच्या षोकासाठीं होणाऱ्या ह्या अवाढव्य खर्चाची कल्पनाही नाहीं. अमेरिकन लोकांचे आवडते खेळ म्हणून बेसबॉल, बास्केट बॉल, घोड्यांच्या शर्यती व फूटबॉल ह्या खेळांचीं नांवें घेण्यांत येतील; पण शिकारीचें नांव सुद्धां कोणी घेणार नाहीं. तरी पण लक्षावधि अमेरिकन ह्या खेळांत भाग घेतात. शिकारीसाठीं लागणाऱ्या साहित्यावर अमेरिकेंत रोज २० लाख पौंड खर्च करण्यांत येतात. बाकीचे ८० लाख पौंड वाहतूक, पेट्रोल, घरभाडें व जेवणखाण ह्यांच्यावर खर्च होतात. इतका खर्च करून हे हौशी शिकारी जी शिकार आणतात ती बाजारापेक्षां महागच पडते. उदा. ट्रॉऊट जातीचा मासा मारण्यासाठीं ह्या लोकांना दर पौंड माशामागें २५ पौंड खर्च येतो. हे मासे बाजारांत ८ पौंडाला १ पौंड मिळतात. पण अमेरिकन शिकाऱ्याला मात्र असें वाटतें कीं आपण शिकार करून 'स्वस्तांत माल मिळविला आहे.' वस्तूची किंमत ती घेणाऱ्याला मिळणाऱ्या समाधानावर अवलंबून असते एवढेंच ह्यावरून सिद्ध होतें.


स्थापना १९३६

**युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा**

[ शेड्यूल्ड बँक ]

*पॅलेस स्ट्रीट, सातारा.*

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नाशिक व बार्शी.

ता. ३०-६-५१ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,४३,७६० |
| रिझर्व व इतर फंड्स | रु. | १,६५,००० |
| ठेवी | रु. | ६७,१९,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ७९,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

१ वर्ष रु. २-८-० ; दोन वर्षे रु. २-११-० ; तीन अगर अधिक वर्षे ३ रुपये

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १-८-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | " | २-०-० |
| चालू डिपॉझिट | " | ०-८-० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर. — एस. एच. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन

---

दि

**युनायटेड कमर्शिअल बँक लि.**

कलकत्ता.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | ८ कोटी रु. |
| खपलेलें भांडवल | ... | ४ कोटी रु. |
| वसूल भांडवल | ... | २ कोटी रु. |
| रिझर्व्ह फंड | ... | ६७½ लक्ष रु. |

: बोर्ड ऑफ डायरेक्टर्स :

जी. डी. बिर्ला ( चेअरमन )

ईश्वरीप्रसाद गोएंका, व्हाइस चेअरमन — रमणलाल जी. सरय्या, व्हाइस चेअरमन

अनंत चरण लॉ — महादेव एल. डहाणूकर

बैजनाथ जालन — मदनमोहन आर. रुइया

गोविंदलाल बंगूर — मोहनलाल एल. शहा

पी. डी. हिमतसिंगका — मोतीलाल तापुरिया

रामेश्वरलाल नोपानी — नवीनचंद्र मफतलाल

: जनरल मॅनेजर :

बी. टी. ठाकूर

भारत, बर्मा, पाकिस्तान आणि मलाया येथील महत्त्वाच्या शहरीं व गांवीं बँकेच्या शाखा असल्यानें आणि बँकेच्या सबंध जगभर एजन्सीच्या व्यवस्था असल्यानें भारतांत व भारताबाहेर अत्युत्कृष्ट बँकिंगची सेवा करण्यास बँक सुसज्ज आहे.

# अर्थ

बुधवार, ता. १७ ऑगस्ट, १९५२





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## प्राप्तकाल उपाययोजना

### परिस्थितीच्या जाणीवेची आवश्यकता

अर्थमंत्री, श्री. देशमुख, ह्यांच्या गेल्या कांहीं भाषणांतून व्यक्त झालेले विचार उद्बोधक होते आणि चालू परिस्थितीचें समतोलपणानें निरीक्षण केलें असतांना दिसणारें चित्र त्यांत स्पष्ट आढळत होतें. आग्रहपूर्वक कोणतीहि गोष्ट प्रतिपादन न करतां, साधकबाधक चर्चा करून, सरकारचें धोरण प्राप्त परिस्थितींत कसें योग्य आहे अथवा दुसरें धोरण कसें अशक्य आहे, हें त्यांचे भाषणांवरून दिसून येतें. व्यापारी किंवा कारखानदार हे त्यांच्या स्वतःच्या अडचणी पुढें मांडतांना दुसरी बाजू स्वाभाविकच विसरतात आणि श्री. देशमुख ह्यांच्या मनमोकळ्या खुलाशामुळें त्यांना निरुत्तर व्हावें लागतें. श्री. देशमुख ह्यांनीं भारतांत सर्व ठिकाणीं दौरा काढून वस्तुस्थितीचें निवेदन केलें, तर त्यामुळें सरकारची व देशाची परिस्थिति लोकांच्या नीट ध्यानांत येण्यास पुष्कळच मदत होईल. भरमसाट आकांक्षा उत्पन्न करण्याची कांहीं सरकारी प्रवक्त्यांची संवय जर मोडली आणि लोकांनाहि त्यांच्या त्यागाचें चीज होण्यांतील अडचणी पटल्या, तर बरेंच कार्य होईल.

भारताचें पुष्कळसें उत्पन्न लष्करी संरक्षण व निर्वासितांची पुनर्वसाहत ह्यावर खर्च होतें आणि ह्या दोन्ही बाबतींत किती खर्चापलीकडे जातां कामा नये, हें ठरविणें अशक्य आहे, असें श्री. देशमुख ह्यांनीं सांगितलें. सरकारच्या टीकाकारांचा दृष्टिकोन दहा वर्षांपूर्वीं होता तसाच कायम आहे, परंतु सरकारचा मात्र बदलत्या काळाप्रमाणें बदलत जाणें अपरिहार्य आहे. पंचवार्षिक योजनेप्रमाणें, पांच वर्षांचे अखेर लोकांच्या रहाणीच्या मानांत कितपत सुधारणा होईल हें सांगतां येणें कठीण आहे; फारच थोडी होईल. परंतु तेवढीहि घडवून आणण्यासाठी सुद्धां लागणारें आर्थिक सामर्थ्य आपल्याजवळ आज नाहीं अशी वस्तुस्थिति आहे. २,००० कोटी रुपयांच्या योजनेस ६०० कोटी रुपयांची तूट येईल. पंचवार्षिक योजनेपैकीं दीड वर्ष होऊनहि गेलें आहे. परकीय मदतीच्या आधारावर भारताची पंचवार्षिक योजना अवलंबून ठेवणें मूर्खपणाचे व अव्यवहार्य ठरेल आणि मर्यादेबाहेर नोटा छापून चलन निर्माण करणें योग्य ठरणार नाहीं. सरकारजवळ तेव्हां फक्त दोनच उपाय उरतात: —कर आणि कर्ज. ह्या दोन्हीं उपाययोजनांत भय हें आहेच; म्हणून केवळ त्यांचा अवलंब न करणें कसें टळेल ? ह्यासाठींच सवंद परिस्थितीची छाननी न तिचें आकलन ह्यांची आवश्यकता आहे. अत्यंत कठीण अवस्था आलेली आहे आणि भवितव्याचें भीषण चित्र पहाण्याचें टाळलें, तरी येणारा प्रसंग टळणार नाहीं.

उद्योगपती प्रत्यक्ष करांचा बोजा उतरविण्याची एकसारखी निकड लावीत असतात, त्यांस उद्देशून श्री. देशमुख म्हणाले, "देशांतील ३६ कोटी लोकांपैकीं फक्त साडेसहा लक्ष लोकांच्या उत्पन्नावरील करावर सरकारनें आपली भिस्त ठेवूं नये, असें द. भारत चेंबर ऑफ कॉमर्सचें म्हणणें. त्याचें उत्तर सोपें आहे : साडेसहा लक्ष लोकांनीं सर्व संपत्ति आपल्यांत एकत्रित का करावी ? संपत्तीची अयोग्य वांटणी दूर करणें, हें आपल्या राज्यघटनेचें एक उद्दिष्ट आहे. कर देऊनहि ज्यांचे जवळ १,००,००० रु. वर शिल्लक रहाते, असें सुमारें ७,५०० लोक असावेत. ही रक्कम भारतांत तरी अवाढव्यच वाटेल. त्यांचेपैकीं कित्येकजण कंपन्यांच्या मालकीच्या बंगल्यांत रहातात, कंपनीनें ठेवलेल्या मोटारींतून हिंडतात–फिरतात, कंपनीच्या खर्चानें मेजवान्या देतात आणि आकारलेला कर देऊनहि त्यांचेजवळ एवढी शिल्लक उरते कीं, त्याचें समर्थन आपल्या देशांत तरी करणें अवघड जाईल. बदलत्या परिस्थितीप्रमाणें, ह्या संबंधांतील कल्पना बदलत जातात, हें व्यापाऱ्यांनीं व उद्योगपतींनीं विसरूं नये. वरच्या श्रेणीच्या उत्पन्नावरील करभार कमी करण्यास तयार होईल, असा एकहि अर्थमंत्री भारताला ह्यापुढें लाभणार नाहीं, अशी माझी अपेक्षा आहे. "

कर्ज उभारणीबाबतच्या अडचणींचा अर्थमंत्र्यांनीं उल्लेख केला आणि बचतीच्या योजना अधिक फलदायी कशा होतील ह्याबाबतहि त्यांनीं चर्चा केली. राज्य सरकारांचें सहाय्य कसें मिळवितां येईल, ह्याचाहि त्यांनीं विचार केला. खेडेगांवांतील लोकांचें क्षितिज मर्यादित असतें; त्यांना भाकरा किंवा दामोदर खोरें हीं नांवें अपरिचित असतात. त्यांसाठीं कर्ज ते देण्यास कसे तत्परतेनें उद्युक्त होणार? त्यांच्या आसपासच्या भागांत त्यांना सुधारणा दिसूं लागल्या पाहिजेत. राज्य सरकारांनाहि उत्साह वाटेल, अशा वातावरणाची आवश्यकता आहे. युद्धकालांत उभारलेलें ५०० कोटी रुपयांचें कर्ज परत फेडण्याची वेळ लवकरच येईल; येत्या वर्षांतच ११० कोटी रुपयांची तरतूद करावी लागेल. कर्ज उभारणी यशस्वी झाली म्हणजे बरें वाटतें, पण कर्जफेडीच्या वेळीं मात्र अडचण उभी राहते. म्हणजे अखेर करवसुलीच्या मार्गें वाढावा उरवूनच भांडवली खर्चाची व्यवस्था करण्याचा कांहीं अंशीं अपरिचित आणि कांहीं अंशीं असमर्थनीय मार्गाचा अवलंब करणें अपरिहार्य ठरतें!

नव्या करभारास लोकांचा किती तीव्र विरोध आहे, हें आतां स्पष्टपणें दिसून आलें आहे. वार्षिक ३०० रु.हि दरमाणशीं प्राप्ति नाहीं, अशा या देशांत कररूपानें किती रक्कम उभारतां येणार, ह्यास मर्यादा आहेत. कर चौकशी मंडळ भारत सरकार लवकरच नेमणार आहे, तें ह्या प्रश्नाचा सर्वांगीण विचार करीलच. करांचे मार्ग मध्यवर्ती व राज्यसरकारें ह्यांत कसे वाटून घ्यावेत, एवढ्यापुरता हा प्रश्न सोपा नाहीं. कर देण्याची पात्रताच लोकांत उरलेली नाहीं अशी तक्रार आहे, आणि पंचवार्षिक योजनेस लागणारा पैसा कराऐवजीं कर्जमार्गें मिळवावा असें नागरिकांचें मत आहे. पण, कर्ज जाहीर केल्यानें केवळ रक्कम जमूं शकत नाहीं आणि त्यांत निश्चितीहि असूं शकत नाहीं, म्हणून सरकार कर्जाऐवजीं करास प्राधान्य देऊं पहात आहे. बचतीस प्रोत्साहन मिळत राहील अशाच रीतीनें करांची आखणी करावी लागेल आणि सरकारला दिलेला पैसा काटकसरीनें व कार्यक्षमतेनें वापरला जात असल्याबद्दल लोकांची खात्री पटवून द्यावी लागेल.

## व्यक्तिगत प्रयत्नांचें राष्ट्रोद्धारांत महत्त्वाचें स्थान

### सरकारसाठी व 'जनते'साठी वाट पाहूं नका

### नव्या दृष्टीची व उत्साहाची आवश्यकता

### (श्री. शंकरराव किर्लोस्कर)

गतकालाबद्दल चिकित्सा करीत न बसतां अतां तरी जागे होऊन आपल्या कर्तव्याला लागूंया.

यावर कोणी म्हणतील कीं, आपल म्हणणें बरोबर आहे, पण आम्ही सामान्य माणसें, आमच्या हातून काय होण्याजोगें आहे ? मोठमोठीं कामें सारीं सरकारनें करावयाचीं. तीं जबाबदारी व कर्तव्यें सरकारनें पार पाडलीं तर देशांत हव्या त्या सुधारणा चुटकीसरशी पार पडून सगळीकडे आबादीआबाद होईल.

तथापि सरकारची शक्ति कितीहि मोठी असली तरी एकूण एक सुधारणा सरकार करूं शकेल हें अशक्य. कुठल्याही देशाचें एकटें सरकार त्या देशाची स्थिति सुधारण्यास असमर्थ असतें. देशाच्या रचनात्मक कार्यांत व प्रगतींत त्या त्या देशांतील लोकांनीं मनापासून व उत्साहानें भाग घेतला तरच त्या देशाची स्थिति भरभर सुधारूं शकते व त्या देशाला चांगले दिवस येतात.

अशी कल्पना न कळत समाजांत रुजून बसलेली दिसते कीं जनतेची प्रचंड संघटित शक्ति जुंपल्याशिवाय कुठलेंहि काम पार पाडतां येण्यासारखें नाहीं. आपल्याला कांहीं करावयाचें असेल, तर शेंकडों, हजारों माणसांनीं जमलं पाहिजे, मिरवणुकी काढल्या पाहिजेत, सभा भरविल्या पाहिजेत, हरताळ पाडले पाहिजेत, तरच जमलं तर कांहीं जमायचं. आतां एकट्या-दुकट्यानें कांहीं करायची सोय राहिली नाहीं. जनतेचा हा कुंभकर्ण परकीय राज्यकर्त्यांविरुद्ध आपण उभा केला होता, तें ठीक झालें. पण आतां स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मात्र प्रत्येक बाबतींत जनतेचा बागुलबोवा पुढें करून स्वतः नामानिराळे राहाण्याचा विचार करूं तर ती स्वतःची घोर आत्मवंचना ठरेल. सारी भिस्त जनतेवर टाकणें म्हणजे आपलें कर्तव्य टाळण्याची एक युक्ति म्हणावी लागेल, अथवा दुबळ्या दैववादाचीच ती एक सुधारलेली आवृत्ति, असेंहि म्हणणें भाग पडेल.

आपण आतां ही गोष्ट ओळखिली पाहिजे कीं ज्याप्रमाणें कांहीं कामें जनतेनें संघटितपणें करावयाचीं असतात, त्याप्रमाणेंच कांहीं कामें एकट्यानें, जोडीजोडीनें अथवा गटांनीं मिळून स्वतः पुढें होऊन करावयाचीं असतात. आणि सध्यां तर अशी वेळ आली आहे कीं ज्याला ज्याला देशासाठीं जें जें काम करतां येईल तें तें त्यानें हौसेनें व निश्चयानें करण्यास पुढें झालें पाहिजे. जनतेसाठी वाट पाहण्यांत अर्थ नाहीं.

सध्या आपल्या देशाची परिस्थिति किती आणीबाणीची झाली आहे हें आपण जाणताच. पण एवढ्यावरच आपलें नष्टचर्य संपलें असें आपल्याला मानतां येत नाहीं. जगांत आजकाल सगळीकडे अशांतता माजत चालली आहे. आपला स्वतंत्र भारत म्हणजे तर पांच वर्षांचें बालक. अगोदरच तें मोठें नाजूक. त्यांतून बेकारीच्या रोगानें तें आणखी हैराण होत आहे. त्याला जतन करायचें काम मोठें अवघड. पण तें आतां जिवापाड मेहनत घेऊन आपणास केलें पाहिजे. अनेकांना असा प्रश्न पडेल, कीं समाजासाठी आमचा प्रपंच सोडून निरनिराळे उद्योग करायला सर्वांनाच कुठें सवड सांपडणार ? आम्ही बरे व आमचें काम बरें. आम्हांला इतर फंदांत पडतां येण्यासारखें नाहीं.

हे म्हणणें अगदीं बरोबर आहे. तथापि आपण तशी दृष्टि पत्करूं तर आपण जें काम रोज करतों, त्याच्या द्वारें सुद्धां नवराष्ट्र निर्मितीच्या कार्याला केवढा तरी हातभार लावतां येईल.

स्वातंत्र्याबरोबर ही नवी दृष्टि आपण पत्करायला हवी होती. या नव्या दृष्टीचा अर्थ व तिचें महत्त्व कुणाच्याहि लक्षांत सहज येऊं शकेल.

शिक्षक असेल त्याला विद्यार्थ्यांकडे पाहतांना राष्ट्राचे भावी आधारस्तंभ समोर दिसले पाहिजेत.

एंजिनिअर असेल तर हिंदुस्थानांतून कच्चा माल नेऊन परत हिंदुस्थानांत पक्का माल येण्याचें कसें थांबवितां येईल, ह्या दृष्टीनें त्याचा प्रयत्न पाहिजे.

शेतकरी असेल तर त्याच्या डोळ्यापुढें राष्ट्रांतील असंख्य भुकेलेल्या स्त्रीपुरुषांचे चेहरे दिसले पाहिजेत व त्यांना पोटभर अन्न कसें घालतां येईल याचा त्याला ध्यास लागला पाहिजे.

फिटर असेल तर तो जो चरक जोडील त्यांत तिळमात्र दोष राहाणार नाहीं, तो शेतकरी बंधूंची उत्कृष्ट कामगिरी बजावील व त्यामुळ शेतकऱ्याच्या घरांत आनंद भरून राहिला आहे हें दृश्य त्याला नेहमीं दिसत राहिलें पाहिजे.

गृहिणी असेल तर स्वतःचें घर म्हणजे राष्ट्राचा एक बिंदूच हें तिनें ओळखलें पाहिजे. पण या बिंदुमात्र राष्ट्रांतच ऐक्य, सुप्रसन्नता, आरोग्य व उत्साह नांदवून आपला संसार राष्ट्राला पोषक झाल्याचें चित्र तिच्या हृदयांत सदैव नाचत राहिलें पाहिजे.

चित्रकार असेल तर आपल्या कलेच्या जादुगिरीनें भोंवतालच्या जगांत भरलेला बेढबपणा आणि विद्रुपता नाहींशी झालेली व त्यामुळ आल्हादकारक व नयनरम्य बनलेली नवी सृष्टि त्याच्या कल्पनाचक्षुपुढें सतत वावरली पाहिजे. चित्रकाराशिवाय जग सुंदर करणार कोण ?

स्त्रीपुरुष, लहानथोर, सुशिक्षित–अशिक्षित, अशा सर्वांनीं आपापले उद्योग करण्यांत अशी नवी दृष्टि बाळगली तर केवढी प्रचंड क्रांति घडून येईल ?

नव्या दृष्टीला हुरुपानें काम करण्याची जोड दिली पाहिजे, तरच आपला उज्ज्वल भविष्यकाल भरभर जवळ आणतां येईल. पण त्या कष्टाची धास्ती बाळगूं नका. कारण अशा उच्च वृत्तीनें आपण कुठलेंहि काम करूं लागूं तर आपण नुसते कामगार राहणार नाहीं तर आपण कामगाराचे कलावंत होऊं व कलावंताचा आनंद केवढा अपूर्व ?

आज इंग्लंड घ्या, अमेरिका घ्या, चीन घ्या, जपान घ्या, तीं राष्ट्रें आपल्यापुढें का ? तिथलीं माणसेंहि आपल्यासारखींच आहेत. त्यांच्याप्रमाणें आपणही स्वतंत्र आहों. अंतर असेल तर तें फक्त दृष्टींत. आपणहि ती दृष्टि धारण करण्याची आतां वेळ आली आहे, नव्हे धारण केली नाहीं तर आपलें पाऊल लवकर पुढें पडण्याची आशा नको.

आपल्या राष्ट्राला यापुढें चांगले दिवस यावेत असें वाटत असेल तर प्रत्येक बाबतींत सरकारवर जबाबदारी टाकून आपण मोकळें होणें जसें चालणार नाहीं, तद्वतच कर्ताकरविता जनताजनार्दन हें पालुपदहि आतां थांबविलें पाहिजे. यापुढें आपल्या देशासाठीं जें जें काम स्वतःला करतां येईल, तें तें करण्यास आपण कंबर बांधली पाहिजे.

( ५ व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त किर्लोस्करवाडी येथें झेंडावंदनाचे वेळीं भाषण. )

### अफगाणिस्थान व रशिआ ह्यांचा व्यापार

पाकिस्तान सरकारनें अफगाणिस्थानची नाकेबंदी केल्यामुळें त्या देशाला आपल्या व्यापाराची दिशा बदलवी लागेल अशीं चिन्हें दिसत आहेत. ह्यासंबंधीं बोलतांना अफगाणिस्थानचे दुय्यम अर्थ-मंत्री मि. गुलाम घोस म्हणाले कीं, पाकिस्ताननें केलेल्या नाकेबंदीमुळें आमच्या व अमेरिका, प. युरोप, आग्नेय आशिआ मधील व्यापार थंडावत जाईल असें वाटतें. त्यामुळें आम्हांला रशिआशी अधिक प्रमाणांत व्यापार करावा लागेल. आमचे व रशिआचे संबंध चांगले आहेत. १९५१ सालीं रशिआशीं आमचा एक व्यापारी करार झाला आहे. त्या कराराप्रमाणें आम्ही रशिआला लोकर, कापूस, फळें, इत्यादी माल निर्यात करतो आणि पेट्रोल, साखर, कापड, चिनीमातीचीं भांडीं व बर्फात घालण्याचे बूट, इत्यादि माल रशिआकडून घेतो. अफगाणिस्थानचें सरकार रशिआशी एक नवा करार करण्याच्या वाटाघाटींत सध्यां गुंतलें आहे. हीं बोलणीं यशस्वी झाल्यास सुमारें दोनतीन महिन्यांत ह्या नव्या करारावर सह्या होतील. अफगाणिस्थान आणि भारत ह्यांच्यांत सध्यां चालू असलेल्या व्यापारी कराराची मुदत १९५३ सालीं संपते. कराराप्रमाणें भारत अफगाणिस्थानकडून सुकीं फळें, गालिचे, लोकर, कापूस, औषधी वनस्पति, इत्यादि माल आयात करतो आणि अफगाणिस्थानला कापड आणि कांहीं प्रकारचा पक्का माल पुरवितो. अफगाणिस्थानांत कांहीं विकास-योजनांना अमेरिकेकडून साह्य करण्यांत येत आहे असें समजतें. पण अमेरिका आणि अफगाणिस्थान ह्यांचा व्यापार बंद पडल्यास विकास-योजनांत अडचणी उत्पन्न होण्याचा संभव आहे.

---

### एका खेडेगांवाची आर्थिक पहाणी

हैद्राबाद इकॉनॉमिक असोसिएशन ह्या संस्थेनें संस्थानांतील चेन्ना गणापूर ह्या नांवाच्या एका खेडेगांवाची आर्थिक पहाणी केली आहे. ह्या गांवांतील २७४ कुटुंबांपैकीं २८ कुटुंबेच जमिनदार होतीं. तीं स्वतः जमिनी करीत नव्हती. गांवांत जमिनी असून तेथें न रहाणाऱ्या अशा जमीन मालकांची संख्या फक्त दहा टक्के होती. हैद्राबाद सरकारनें आर्थिक दृष्ट्या किफायतशीर होण्यास शेतीची जमीन कमींतकमी ५० एकर असली पाहिजे असें ठरविलें आहे. पण ह्या खेड्यांतील जमीन-मालकांच्या वांटणीची जमीन सरासरीनें २१ एकरच पडली. फक्त दोनच मालकांच्या जमिनी २५० एकरांपेक्षां अधिक होत्या. पुष्कळशा शेत-मालकांजवळ फक्त एकच गुरुं होतें आणि कित्येकांजवळ स्वतःच्या मालकीचा नांगरही नव्हता. त्यामुळें हंगामांत त्यांना नांगर आणि बैलजोडी भाड्यानें घ्यावी लागत असे. गांवांत ग्रामोद्योग असे कांहीं नव्हतेच; सगळे लोक शेतीवरच अवलंबून होते. शेतजमीन असणारे पण गैरहजर मालक सोडले तर फक्त ८ कुटुंबांनाच कर्जे नव्हतीं. बहुतेक कुटुंबांना कर्जे होतीं आणि त्यांचें प्रमाण त्यांच्या मालमत्तेच्या १७.९ टक्के पडलें. कर्जाच्या रकमा २८३ रुपयांपासून १,२०० रुपयांपर्यंत आढळून आल्या. एका कुटुंबांत सरासरी पांच माणसें धरलीं तर दरडोई दरमहिना अवघे ९ रुपये उत्पन्न आहे असें दिसून आलें. गांवांतील लोकमत सहकारी शेतीच्या फारच विरुद्ध दिसून आलें. तथापि, सामुदाइक शेती करण्यास मात्र लोक फारसे विरुद्ध दिसले नाहींत. पहाणीचा निष्कर्ष असा काढण्यांत आला आहे कीं, गांवांतील शेती हा एक किफायतशीर आर्थिक व्यवहार नसून केवळ उपजीविकेचें तें एक साधन आहे.

### भारतांतील विदेशी कंपन्यांत विदेशीयांचा भरणा

#### हिंदी अधिकाऱ्यांचें उच्चाटण ?

भारतांत व्यापार व उद्योग करणाऱ्या बऱ्याच विदेशी फर्म्स आहेत. त्यांतील हिंदी अधिकाऱ्यांची बढती थांबविण्यांत येत आहे आणि विदेशी अधिकाऱ्यांचा भरणा वाढविण्यांत येत आहे अशी तक्रार भारत सरकारच्या कानावर गेली आहे. कित्येक हिंदी अधिकाऱ्यांचें उच्चाटण करून, आयात केलेल्या विदेशीयांना त्या जागा दिल्या जात आहेत अशीहि तक्रार आहे. व्यापारांत विदेशी फर्म्स अधिकाधिक लक्ष घालूं लागल्या आहेत. ह्या चिंतनीय परिस्थितीची चौकशी करण्याचें भारत सरकारनें ठरविलें आहे. ३०० तें ४९९ रु., ५०० ते ९९९ रु. आणि १००० रु. वर पगार मिळविणाऱ्या हिंदी व विदेशी अधिकाऱ्यांविषयीं तपशीलवार माहिती जमा करण्यास सरकारनें प्रारंभ केला आहे. व्यापार, कारखानदारी, बँका, विमा कंपन्या, आगबोट कंपन्या, निमसरकारी कंपन्या, मळे, मॅनेजिंग एजन्सी फर्म्स, इत्यादींकडून तपशील मागविण्यांत येत आहे.

---

### दरसाल ५० लक्ष कृत्रिम दातांचें उत्पादन

प्लॅस्टिकचे दांत तयार करणारा एक कारखाना प. बंगाल सरकार कलकत्ता येथें उभारीत आहे. त्यांत दरसाल २० ते ५० लक्ष दांत तयार होऊं शकतील. पहिल्या वर्षी ५ लक्ष दातांचें उत्पादन केलें जाईल. स्वित्सरलंडमधून मागविलेल्या यंत्रसामुग्रीची उभारणी चालू आहे. दांत करण्यास लागणारी विशेष प्रकारची प्लॅस्टिकची पावडरहि स्वित्सरलंडमधून आयात केली जाईल. हिंदी लष्करी खात्यास दरसाल २ ते ५ लक्ष कृत्रिम दांत लागतात. सध्या भारत ग्रेटब्रिटन व अमेरिका येथून दातांची आयात करतो.


## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

स्थापना १९३५ : शेड्यूल्ड बँक

संचालक मंडळ

| | |
|---|---|
| श्री. धों. कृ. साठे (अध्यक्ष) | श्री. श्री. गो. मराठे (उपाध्यक्ष) |
| श्री. न. ग. पवार | श्री. मा. रा. जोशी |
| श्री. फ. दो. पदमजी | श्री. मा. वी. शहा |
| श्री. शं. ल. किर्लोस्कर | श्री. मा. म. गुप्ते |

बँकेच्या शाखा

मुंबई (फोर्ट, गिरगांव, दादर व कल्याण), पुणें (डेक्कन जिमखाना व खडकी), नाशिक, चाळिसगांव, धुळें, जळगांव, नागपूर, रत्नागिरी, कोपरगांव, हुबळी, सोलापूर, कोल्हापूर, व. हैद्राबाद, सांगली व अमरावती.

मुख्य कचेरी
लक्ष्मी रोड, पुणें २.

नि. वि. जोग,
मॅनेजर.

## इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया

कॉर्पोरेशनचें वसूल भांडवल ५ कोटी रु. असून रिझर्व्ह फंड २ लक्ष रु. आहे. ५ कोटी, ८०१ लक्ष रुपयांचे बॉंडस तिनें विकलेले आहेत. कॉर्पोरेशननें ७,२४,९८,२६६ रु. चीं कर्जें दिलेलीं आहेत आणि ३,०८,१८,१०७ रु. सरकारी रोख्यांत ठेवले आहेत.

३० जून १९५२ अखेर संपलेल्या वर्षीं कराची वगैरे तरतूद करून कॉर्पोरेशनला ९,२५,२९१ रु. निव्वळ नफा झाला. कायद्याप्रमाणें १ लक्ष रु. रिझर्व्ह फंडांत टाकल्यावर डिव्हिडंड देण्यासाठीं ८,२५,२९१ रु. उरतात. मध्यवर्ती सरकारनें २½% डिव्हिडंडची हमी घेतली आहे, ती पार पाडण्यास २,९९,७०९ रु. कमी पडतात ते सरकारकडून घ्यावे लागतील. पहिल्या तीन वर्षी मिळून अशा रीतीनें सरकारकडून २३,८९,४१६ रु. घेण्यांत आले आहेत. त्यांत वरील रकमेची भर पडणार आहे.

कॉर्पोरेशनच्या भागांची वांटणी खालीलप्रमाणें आहे :— मध्यवर्ती सरकार २०००, रिझर्व्ह बँक २०५४, शेड्यूल्ड बँका २४३५, विमा व इतर कंपन्या २५६८, सहकारी बँका ९४३.

कॉर्पोरेशननें दिलेल्या कर्जावर फेब्रुवारी १९५२ पर्यंत ५½% व्याजाचा दर आकारला जाई व वक्तशीर फेडीस ½% रिबेट देण्यांत येई. त्यानंतर व्याजाचा दर ६% करण्यांत आला आहे; रिबेटचा दर पूर्वीचाच आहे.

अहवालाचे वर्षी (३० जून, १९५२ अखेरच्या)गेल्या वर्षीपेक्षां कर्जासाठीं अर्ज ज्यास्त आले. मंजूर अर्ज गेल्या वर्षीपेक्षां दुप्पट होते आणि मंजूर कर्जहि जवळजवळ दुप्पट होतें. अर्जांची विल्हेवाट सत्वर लावण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे, त्याचा हा परिणाम आहे. आलेल्या अर्जांचा दर्जाहि अधिक चांगला होता. यंत्रसामुग्री व कच्चा माल हीं मिळण्याची शक्यता वाढली, हीहि एक अनुकूल बाब होती. कांहीं अर्जदारांनीं कर्जमंजुरीनंतर योजना बदलल्या, तर कांहींनीं मंजर कर्ज घेतलेंच नाहीं. परंतु असे प्रकार कमी कमी घडत आहे.

अहवालाचे वर्षी मंजूर केलेल्या ४,४५,२५,००० रु. कर्जांपैकीं १,००,५०,००० रु. रासायनिक कारखान्यासाठीं; ९५,००,००० रु. साखरेसाठीं; ७१,००,००० रु. कागदासाठीं; ४३,७५,००० रु. कपास कापडासाठीं; ३९,००,००० रु. सिरॅमिक्स व ग्लाससाठीं आणि ३०,५०,००० रु. इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगसाठीं होते. कॉर्पोरेशननें सुरवातीपासून ३० जून १९५२ अखेर मंजूर केलेल्या एकूण कर्जांची बेरीज १४,०३,४५,००० रु. भरते. कर्जाची रकम हळुहळु वाढत गेली असली, तरी कर्जमंजुरीनंतर सबंध कर्ज उचलण्यास जो विलंब लागतो त्यामुळें व्याजाचें नुकसान कॉर्पोरेशनला सोसावें लागतें. त्याचा परिणाम नफ्यावर होतो.

मंजूर कर्जांची वर्गवारी खालीलप्रमाणें आहे.

| | संख्या | रकम (रु.) |
|---|---|---|
| १० लक्ष रु. वर | ५३ | २,३९,४५,००० |
| १० ते २० लक्ष रु. | २१ | ३,२१,००,००० |
| २० ते ३० लक्ष रु. | ७ | १,९५,००,००० |
| ३० ते ४० लक्ष रु. | ५ | १,९५,००,००० |
| ४० ते ५० लक्ष रु. | ८ | ३,९३,००,००० |
| एकूण | ९४ | १४,०३,४५,००० |

सहकारी बँकांचे प्रतिनिधी म्हणून इं. फि. कॉर्पोरेशनवर ७ जून १९५२ रोजीं श्री. वा. पुं. वर्दे ह्यांची श्री. टी. ए. रामलिंगम् चेट्टिअर ह्यांच्या निधनामुळें रिकाम्या झालेल्या जागीं निवडणूक झाली. श्री. व्ही. आर. सोनाळकर हे कॉर्पोरेशनचे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत. वार्षिक सभा ३० ऑगस्ट रोजीं भरणार आहे.

### लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालयास मुंबई विधिमंडळ सभासदांची भेट.

मुंबई विधिमंडळाच्या ४० काँग्रेस सभासदांनीं संग्रहालयास गुरुवार, दिनांक २१ ऑगस्ट १९५२ रोजीं सकाळीं भेट दिली. कॉर्पोरेशनच्या एरंडवणा उद्यानांत संग्रहालयाच्या विद्यमानें शेती शिक्षणाचे वर्ग चालविण्यांत येत आहेत. या वर्गांत शेतीचें प्रात्यक्षिक शिक्षण देण्यांत येतें. विद्यार्थी शेतांत हें काम करीत असलेले सभासदांना दाखविण्यांत आले. यानंतर कॉमन्वेल्थ इमारतींतील व्यापारसंवर्धनगृह व शेती-संग्रहालय त्यांनीं पाहिलें. याच ठिकाणीं सभासदांना शैक्षणिक चित्रपट दाखविण्यांत आले. त्यानंतर फुले-मंडईवरील संग्रहालयास सभासदांनीं भेट दिली. या विभागांत ग्रंथालय दाखविण्यांत आलें. संग्रहालय करीत असलेल्या शिक्षणविषयक कार्याची व त्याचप्रमाणें संग्रहालयाच्या शेतीविभागाच्या विद्यमानें चालविण्यांत येणाऱ्या व्याख्यानमालेविषयींहि माहिती देण्यांत आली.

### बँकर्स त्रैमासिकाचे संपादक

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ बँकर्सच्या त्रैमासिकाचें संपादकत्व डॉ. एस. जी. पाणंदीकर, इंडियन बँक्स असोसिएशनचे सेक्रेटरी, ह्यांनीं पत्करलें आहे.

### इंपीरिअल बँकेच्या शाखा

इंपीरिअल बँक जून, १९५३ पूर्वी ३० नव्या शाखा उघडणार आहे आणि ३० विद्यमान ट्रेझरी पे ऑफिसेसचें शाखांत रूपांतर करणार आहे. पाकिस्तानांतील १६ शाखा बंद करण्यांत येतील. तेथील ९ शाखा चालू ठेवल्या जातील.


# दी आदर्श कृपिसंस्था लि. धुळें
# (प. का.)

(स्थापना १९४५)

* कंपनीचें भांडवल रु. १०,००,०००/- असून ते प्रत्येकीं रु. २५/- याप्रमाणें ४०००० शेअर्समध्यें विभागलें आहे.
* शेअर्सवर ६%, ६%, ८% व १०% असे डिव्हिडंड दिलें गेलें व नुकत्याच संपलेल्या वर्षाकरतां १०% दिलें जाईल. अशा रीतीनें शेअरहोल्डर्सना आतांपावेतोंच ४०% नफारूपानें दिले गेले.
* अशाहि परिस्थितींत शेअर्सची विक्री मूळ किंमतीस करून धंद्याचे वाढीकरतां तीन लक्ष रुपयांचे शेअर्स विकावयाचे आहेत.

— शेअर्सची विक्री चालू आहे. —

मॅनेजिंग डायरेक्टर

### बिहारमधील लाखेच्या धंद्याला धोका

बिहारचे उद्योगमंत्रि श्री. महेश प्रसाद सिंह ह्यांनीं बिहारमधील लाखेच्या धंद्याला उत्पन्न झालेल्या धोक्याकडे लक्ष वेधलें आहे. ब्रह्मदेश, मलाया, सयाम व इंडोचायना ह्या देशांत तयार होणाऱ्या लाखेची बिहारमधील लाखेला आतां स्पर्धा होऊं लागली आहे. लाखेच्या किंमतींत विलक्षण चढउतार झाल्यामुळेंच हा धोका मुख्यतः निर्माण झाला आहे. ह्या धंद्यांत बहुतेक करून खेडेगांवांतील शेतकरी गुंतलेले असून लाखेला किमान किंमत प्राप्त करून देण्याची हमी दिल्या खेरीज त्यांची परिस्थिति सुधारण्याची आशा नाहीं. इतकेंच नाहीं, तर हा व्यवसायच हळूहळू बसूं लागून कायमचा नाहींसा होईल अशी भीति व्यक्त करण्यांत येत आहे. लाखेची लागवड योग्य रीतीनें चालू ठेवण्यासाठी किमान किंमतीची हमी, येवढाच मार्ग आहे. बिहारच्या सरकारनें लाख वापरणाऱ्या धंद्यांना शक्य ती सर्व मदत करण्याचें आश्वासन दिलें आहे. रांची येथें भरलेल्या व्यापारी परिषदेंत श्री. सिंह हे बोलत होते. त्याप्रसंगीं हजर असलेल्या व्यापाऱ्यांनीं ह्या धंदा वाचविण्यासाठी कांहीं सूचना केल्या आहेत. त्यांत एक सूचना अशी करण्यांत आली आहे कीं, कलकत्ता येथील लाख एक्सचेंज बंद करण्यांत यावा आणि निर्यातीचे व्यापारी व दलाल ह्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यांत यावें; त्याशिवाय लाखेच्या बियांच्या निर्यातीवर बंदी घालण्यांत यावी अशीही मागणी करण्यांत आली. बिहार सरकारनें ह्या धंद्याबाबत दिलेलें आश्वासन धंद्याच्या रक्षणाच्या दृष्टीनें इष्ट असेंच आहे.

### भूमध्य समुद्र आणि तांबडा समुद्र ह्यांस जोडणारा कालवा

सुएझ कालव्याच्या खोदाईमुळें गेल्या शतकांत जागतिक, राजकीय व आर्थिक इतिहासास नवें वळण लागलें. परंतु, त्या कालव्याच्या संबंधांत आतां दोन गैरसोई दिसून येऊं लागल्या आहेत. कांहीं ठराविक वजनाच्या व आकाराच्या आगबोटींपेक्षां मोठ्या आगबोटी सुएझ कालव्यांतून जाऊं शकत नाहींत आणि आगबोटी तर मोठमोठ्या होऊं लागल्या आहेत. दुसरी गोष्ट म्हणजे सुएझ कालवा कंपनीच्या सवलती संपून ह्या जलमार्गाची मालकी १९६८ मध्यें इजिप्तकडे जाणार आहे. म्हणून, भूमध्यसमुद्र आणि तांबडा समुद्र ह्यांस जोडणारा एक नवा कालवा खोदण्याच्या प्रश्नास आतां पुनः चालना मिळाली आहे. दोन ठिकाणीं कालवा खोदतां येण्याजोगा आहे, परंतु खरी अडचण उपस्थित होईल, ती राजकीयच असणार. कोणताहि कालवा खोदला, तरी त्यामुळें भारताकडे यावयास लागणाऱ्या वेळांत एका दिवसाची बचत होईल.

### अंतरें आकसूं लागलीं

लंडन तें कोलंबो (कराची-मुंबईमार्गे) बी. ओ. ए. सी. जेट कॉमेट एअरलाइनची ये-जा नुकतीच सुरू झाली. ह्यापुढें, सर्व पिस्टन इंजिनवाल्या विमानांची जागा जेट इंजिनवालीं विमानें हळुहळु घेतील, असा रंग दिसतो. ह्या लंडन-कोलंबो सर्व्हिसमुळें लंडन-कराची २२½ तासांचें अंतर १४ तासांवर आलें आहे. लंडन-मुंबईला १५ तास व लंडन-कोलंबोला २१½ तास लागतील. लंडन-मुंबई ह्या प्रत्यक्ष प्रवासास फक्त १२ तासच लागले. लवकरच लंडन-सिंगापूर कॉमेट सर्व्हिस सुरू होईल, तेव्हां लंडनहून कलकत्त्यास येण्यास १९ तास पुरतील; सध्या ३२ तास लागतात. कालांतरानें, ऑस्ट्रेलियापर्यंत हीं विमानें जाऊं लागतील. म्हणजे, सध्याचा तो ८५ तासांचा प्रवास ३७ तासांवर येईल. कॉमेट विमानांत ३६ उतारूंची सोय असते. ताशीं ४९० मैल हा त्याचा कमाल वेग असूं शकतो.


## दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.

## ठेवी स्वीकारण्यांत येतात

ठेवींवर दरसाल दर शेंकडा ७॥ रुपये व्याज दिलें जातें. व्याज दर तीन महिन्यांनीं दिलें जातें. ठेवीदारास ठेवीची मुदत संपण्यापूर्वी आपली रक्कम परत पाहिजे असल्यास एक महिन्याच्या आगाऊ नोटिसीनें केव्हांही व्याजासह परत मिळूं शकते.

**पेडणेकर आणि कंपनी लिमिटेड**

शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी,

१७२, गिरगांव रोड, मुंबई ४

टेलिफोन २२७३८ तारेचा पत्ता : 'PEDNECO' Bombay

## भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

मुख्य कचेरीः—भोर, जि. पुणें.

शाखाः—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७१,६०० |

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

| | |
|---|---|
| श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. | न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष. |
| रावसाहेब य. द. खोले. | श्री. चं. रा. राठी. |
| श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलूएल्. बी. | श्री. बा. ग. धंदुके. |

सरकारी रोखे खरेदी-विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षें मुदतीसाठीं कायम ठेवी स्वीकारते. दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरीः—बुधवार घ. नं. ३६१-६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठीं लिहा.

वाय. एस. जोशी

ॲ. मॅनेजर.

दि
प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.
( शिड्यूल्ड बँक )
प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग
पुणें २.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. | १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. | ७,१९,४८५ |
| खेळतें भांडवल | रु. | ७५,००,००० |

मुंबई शाखाः—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. द्रा. ग. बापट, उपाध्यक्ष.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

श्री. गो. धों. जोगळेकर
बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी.,
मॅनेजर.

श्री. सी. टी. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर.



॥ श्री ॥

दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

॥ केल्यानें होत आहे रे ॥ 'समर्थ'

नवीन मशिनरीनें

ता. ३०-६-५२ पर्यंत ७६,००० पोतीं साखर तयार झाली

— अद्याप ३८५ एकर ऊंस गळिताकरितां आहे —
त्यामुळें आणखी एक महिना कारखाना चालेल.

ठेवीबरोबर कांहीं शेअर घ्यावेत
या योजनेमुळें नवीन शेअर येऊन
पंचवीस लक्ष रुपयांचें सव्वीस लक्ष रुपये
शेअर-भांडवल झालेलें आहे.

महाराष्ट्रीयांच्या व्यवहारशास्त्राप्रमाणें
—भांडवल स्वीकारावें लागतें—

शेअरविक्री चालूं आहे.

शेअर व ठेवीचे फॉर्म कंपनीच्या पुणें येथील मुख्य कचेरींत मिळतील.

कॉमनवेल्थ बिल्डिंग,
९८० सदाशिव पेठ, लक्ष्मी रोड,
पुणें २.
दि. २ जुलै १९५२.

चंद्रशेखर गोविंद आगाशे,
बी. ए., एलएल. बी.,
सी. जी. आगाशे ॲण्ड को.,
मॅनेजिंग एजंट्स.


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे. बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास'. ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.